दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ८ वा ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 23 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 8 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## लाडकी बहीण योजनेचा गैरलाभ

# राज्यभरातील १,१८३ सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी लाटले पैसे, सरकारकडून कारवाईची तयारी

मुंबई (वृत्तसंस्था)–आर्थिकदृष्ट्या गरीब आणि गरजू महिलांसाठी असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यातील १,१८३ जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी गैरप्रकारे लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी अशा कर्मचाऱ्यांवर आता कारवाईची टांगती तलवार आहे. या योजनेचा गैरलाभ घेणाऱ्यांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सरकारी महिला कर्मचाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या प्रकरणात सर्वाधिक महिला कर्मचारी बुलढाणा जिल्ह्यात असून त्यांची संख्या १९३ आहे. त्याखालोखाल सोलापूर (१५०), लातूर (१४७), बीड (१४५) आणि उस्मानाबाद (११०) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. पुणे (५४), कोल्हापूर (२४), अहमदनगर आणि सांगली (१७) तसेच नागपूर (११) जिल्ह्यांमध्येही अशाच महिला कर्मचाऱ्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. काही जिल्ह्यांमध्ये ही संख्या अगदी एक किंवा दोन एवढीच आहे.

'लाडकी बहीण' योजनेच्या नियमांनुसार, एका घरात दोनपेक्षा अधिक महिलांना लाभ घेता येत नाही. मात्र, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल २६ लाख महिलांची यादी महिला व बालकल्याण विभागाने तयार केली आहे. आता या महिलांची चौकशी सुरू झाली असून, यातून लाखो महिलांना योजनेतून वगळले जाण्याची शक्यता आहे.सध्या राज्यात २ कोटी २९ लाख महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, या पडताळणी प्रक्रियेनंतर लाभार्थींची संख्या कमी होण्याची शक्यता आहे. यात शासकीय महिला कर्मचारीही अपात्र ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.




### नोटीस बजावून कारवाई केली जाणार

आर्थिक निकषावर आणि अटीवर महिलेला या योजनेचा लाभ घेता येतो. परंतु शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी देखील प्रशासनाची दिशाभूल करत या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतचे पत्र बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्राप्त झाले असून त्यानुसार संबंधित महिला कर्मचाऱ्याला नोटीस बजावून कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या सिओंनी दिली आहे..

# एकजुटीमुळेच काँग्रेस पक्ष मजबुत–खा.रजनीताई पाटील

**केज । प्रतिनिधी**

शिमला येथील पीटरहॉफ येथे शुक्रवार रोजी मतचोरी विरोधात रॅली काढण्यात आली. हिमाचल प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना काँग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळेच आजही सक्षम व मजबूत आहे. कार्यकर्त्यांच्या सक्रियतेमुळेच संघटनाला नवसंजीवनी मिळते, असे प्रतिपादन काँग्रेसच्या हिमाचल प्रदेश प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांनी केले यावेळी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू, प्रदेश काँग्रेस अध्यक्षा प्रतिभा सिंह, हिमाचल प्रदेश काँग्रेस प्रभारी खा रजनीताई पाटील आदी उपस्थित होते. यानंतर,खा. रजनीताई अशोकराव पाटील व मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत काँग्रेस आमदार दलाच्या बैठकीत सहभाग घेतला.



या बैठकीत येत्या काळात पक्षाच्या वतीने आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा झाली तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ठोस रणनीती आखण्यात आली. आम्ही पूर्ण समर्पण आणि एकजुटीने काँग्रेस पक्षाची मजबुती, तसेच राज्याची सेवा आणि विकासासाठी सातत्याने कार्य करत राहू मत व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या की, कार्यकर्त्यांमधील परस्पर सहयोग आणि निष्ठा हेच पक्षाच्या बळाचे प्रमुख स्तंभ आहेत. स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत काँग्रेस पक्षाने नेहमीच लोकांच्या हितासाठी काम केले आहे. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि शेतकरी–श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे असे मत व्यक्त केले.

# युवा कौशल्य कृषी विकास संस्थेचे सुपे तालुका बारामती येथे कौशल्य प्रशिक्षण केंद्राची स्थापना

**बारामती । प्रतिनिधी**

युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर चे श्री स्वामी समर्थ ट्रेनिंग सेंटर बारामती तालुक्यातील सुपे या ठिकाणी सुरू करण्यात आले. या प्रशिक्षण केंद्राचा उद्घाटन समारंभ पार पाडला. या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय ईश्वर निमसे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कामकाजाविषयी व संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षणासंबंधी सर्व माहिती दिली. महिलांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या व्यवसाय उभा करून आपल्या संसारास आर्थिक हातभार लावावा. यातून महिलांचे उद्योजक होण्याचे स्वप्न त्या पूर्ण करू शकतात आणि त्यासाठी आपली संस्था प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न करते. म्हणूनच महिलांनी याचा फायदा घ्यावा असे आवाहन माननीय निमसे साहेबांनी केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या बारामती तालुका बिझनेस मॅनेजर अश्विनी अमोल बर्गे यांनी केले. त्यांनीच हे श्री. स्वामी समर्थ प्रशिक्षण केंद्र सुरू केले. ह्या प्रशिक्षण केंद्राचा मुख्य उद्देश परिसरातील महिलांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण निवडता यावे व त्याचा लाभ घेता यावा असे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात नमूद केले. या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे खजिनदार निलेश आखाडे, श्री. अवधूत घोरपडे, श्री. अमोल बर्गे , अजय सूर्यवंशी, गौरव जवळकर गावातील मान्यवर आणि महिला उपस्थित होत्या

# राष्ट्रीय हिताच्या बातम्यांकडे दुर्लक्ष म्हणत खा.सोनवणेंनी वेधले सभागृहाचे लक्ष

## राज्यमंत्री डॉ.मुरुगन यांच्याकडून टीआरपी प्रणाली मधे बदल करण्यास मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

सध्या दूरदर्शन वाहिन्यांवरील बातम्यांचे मूल्यांकन 'टीआरपी' (टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्स) च्या आधारे होत असल्यामुळे उच्च–टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांना प्राधान्य दिले जाते, तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या परंतु कमी टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केली. या प्रश्नाला उत्तर देताना माहिती व प्रसारण तसेच संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.



खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत अनेक विषयावर महत्वाची चर्चा केली असून अलिकडे अधिक टीआरपी मिळविण्यासाठी किळसवाणे व्हीडीओज, विद्वेष पसरवणारे डिबेट्स, अनैतिक व सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखविले जात आहेत. त्यामुळे निकोप समाज निर्मितीला गंभीर धोका निर्माण झाला आहे. राजव्यवस्था, धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि व्यक्तिमत्व विकास यावर प्रसारमाध्यमांचा स्लो पोईजनिंगसारखा परिणाम होत असतो, असा मुद्दा मांडला. यावर उत्तर देताना डॉ.मुरुगन म्हणाले, नोंदणीकृत प्रेक्षक रेटिंग एजन्स्यांकडून मिळणाऱ्या डेटावर आधारित असलेली विद्यमान प्रणाली सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मंत्रालयाने टीआरपी मोजणीसंदर्भातील विद्यमान धोरण मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याचा मसुदा संकेतस्थळावर सार्वजनिक चर्चेसाठी प्रसिद्ध केला आहे.

सरकारच्या मते या सुधारणा केल्यामुळे न्याय्य स्पर्धेला प्रोत्साहन मिळेल, अधिक अचूक व प्रतिनिधिक डेटा निर्माण होईल, देशभरातील प्रेक्षकांच्या विविध व बदलत्या माध्यम वापराच्या सवयींचे योग्य प्रतिबिंब दिसेल. त्यामुळे टीआरपी मूल्यांकनात गुणात्मकतेलाही महत्त्व दिले जाईल आणि अनैतिक स्पर्धेला आळा बसण्याची अपेक्षा आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखवू नयेत, अशीही मागणी केली. विकासात्मक विषयासोबतच सामाजिक स्वास्थ बिघडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या विषयावर खा.सोनवणे यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच खा.सोनवणे यांनी उल्लू टीव्ही या चॅनलवरील विकृत कार्यक्रमांचे प्रसारण बंद करण्यात महत्वाची भूमिका निभावली होती. यानंतर राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.

# बैलपोळ्याचा थाट; मेहेर परिवाराची भक्ती,विश्वास आणि आपुलकीची झगमग!

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

बैलपोळा सण म्हणजे बळीराजाच्या कष्टाला वंदन आणि परंपरेला मानाचा मुजरा! त्या थाटामध्ये याही वर्षी मा. संतोषशेठ मेहेर सर यांच्या मेहेर ज्वेलर्स,मेहेर कलेक्शन व बालाजी ट्रेडर्स येथे सोन्यासारखी तेजस्विता आणि माणुसकीने भरलेला भावनिक उत्सव साजरा करण्यात आला.

घरासमोर व दुकानासमोर आकर्षक रांगोळ्या,विविध रंगांची सजावट आणि महापूजा–आरतीने संपूर्ण मेहेर



परिवार,नातेवाईक व सर्व कामगार बांधव स्टाफ यांनी आनंद व्यक्त केला. विश्वास,गुणवत्ता आणि नम्रतेचं झळाळतं रूप म्हणजेच मेहेर परिवार!या सोहळ्यास लोकशाही पत्रकार संघ बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा निसर्ग व सामाजिक पर्यावरण निवारण मंडळाचे राज्य प्रसिद्धी प्रमुख अण्णासाहेब साबळे (आष्टी) यांनीही उपस्थित राहून मेहेर परिवाराच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. शेवटी मेहेर परिवाराचा बैलपोळा ; भक्ती,परंपरा आणि माणुसकीचा सुवर्णस्पर्श!


# ठाणे घोडबंदर रोडवरील अवजड वाहनांची वाहतूक मध्यरात्री १२ ते सकाळी ६ करा–प्रताप सरनाईक

**संतोष पडवळ । ठाणे**

घोडबंदर सेवा रस्त्याच्या मुख्य रस्त्यात विलिनीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत दिवसा या मार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक थांबवणे आवश्यक आहे. तरच नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळू शकेल. त्यामुळे ठाणे वाहतूक पोलिसांनी मिरा–भाईंदर आणि पालघर वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून घोडबंदर रस्त्यावरील अवजड वाहनांना मध्यरात्री १२ ते सकाळी ६ वाजेपर्यंतच परवानगी द्यावी. त्याबदद्लची अधिसूचना लवकरात लवकर काढावी, असे निर्देष परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. त्याचबरोबर, घोडबंदर सेवा रस्त्याच्या विलिनीकरणाचे उर्वरित काम १५ सप्टेंबरपासून सुरू करून ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात यावे. त्यासाठी एमएमआरडीएने आखलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकासकामांबाबत आढावा घेण्यासाठी गुरूवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालय येथील कै. अरविंद पेंडसे सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. .महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून कामांची गती चांगली राखली आहे. त्यामुळे १५ ऑक्टोबरपर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करणे शक्य होईल, असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# लहानपण दे गा देवा...



दिवशी मी कामाहून घरी यायला निघालो होतो. प्लॅटफॉर्मवर येऊन पोचलो. पण अगदी दोन मिनिटांनी माझी लोकल चुकली. आता आणखी सात-आठ मिनिटे पुढच्या ट्रेनसाठी ताटकळत राहावं लागेल, म्हणून चिडचिड होत होती. नंतरच्या ट्रेनमध्ये कसाबसा प्रवेश करण्यात मी यशस्वी झालो. उसाच्या गुऱ्हाळात ऊस चिपाड होऊन बाहेर फेकला जातो, जवळजवळ तसाच मी उतरताना डब्यात दाटीवाटीने कोंबलेल्या गर्दीमुळे अगदी चुरगळून बाहेर फेकलो गेलो. मनात नीरस भाव स्रवायला लागले.रिक्षा स्टँडवर तर प्रत्येक रिक्षावाल्याने माझ्या नाकासमोर येऊन टिच्चून नकारघंटाच वाजवायची ठरवली होती, असं मला वाटलं. माझ्या याचनेला शेवटी एका उदार रिक्षावाल्याने दाद दिली. प्रवासातल्या ह्या त्रासिक कटकटींनी कंटाळलेल्या अवस्थेत मी घराच्या दारावरची बेल वाजवली आणि दार उघडताच 'आजोबा आले,' असं जोरात ओरडत माझ्या सहा वर्षांच्या नातीने माझ्या मळून गेलेल्या कपड्यांची पर्वा न करता धावत येऊन मला घट्ट मिठी मारली. त्या क्षणी माझा दिवसभराचा त्रास, त्रागा आणि नकारात्मकता नातीच्या मिठीत विरघळून गेली. 'जादूची झप्पी' काय असते, त्याचा मला प्रत्यय आला.

खरंच या नातवंडांचं प्रेम केवढे निरपेक्ष असतं! आजोबांच्या ओढीपुढे या नातवंडांच्या मनात आजोबांचे घामाने चिंब भिजलेले कपडे, थकलेला चेहरा एकदम गौण ठरतात. अशा निरपेक्ष प्रेमाने ओथंबलेल्या नातवंडांच्या जादूच्या झप्प्या ज्या घरात अनुभवल्या जातात, त्या घरात आनंदाच्या थप्प्याच रचल्या जातात, असं माझं प्रांजळ मत आहे. आपण कितीही मोठे झालो... कितीही उच्चपदस्थ झालो, कितीही सोयीसुविधांनी मढवलेल्या घरात राहायला लागलो; तरी निर्लेप अमूल्य आनंदाच्या क्षणांचा लेखाजोखा मांडू लागलो तर प्रौढपणात आपल्यातले बालपण जागवणाऱ्या नातवंडांबरोबरचे व्यतित केलेले क्षण निश्चितच अग्रस्थान पटकावतात. नातवंडांबरोबर सापशिडी, आंधळी कोशिंबीर, लपाछपी असे बालपणीचे खेळ खेळता खेळता आपण लहानांहून लहान होत जातो आणि संत तुकारामांनी रचलेल्या 'लहानपण देगा देवा... मुंगी साखरेचा रवा' या पंक्तींची अनुभूती ही नातवंड नकळत आपल्याला सतत करून देत राहतात.दोन दिवसांपूर्वीच फोनवर बोलताना बहीण म्हणाली, आज थकल्यासारखं वाटत आहे रे ! म्हणून तिला भेटायला तिच्या घरी गेलो. ती एकाच जागी बसून बोलत होती. थकल्यासारखी दिसत होती खरी. इतक्यात शाळेतून तिची नात आली आणि जादूची कांडी फिरावी, तसा बदल बहिणीत दिसू लागला. लगबगीने जाऊन तिने तिच्या नातीला दूध, खाणं दिलं. तिच्या नातीला वरच्या कपाटातलं खेळणं हवं होतं, म्हणून ते स्टूलवर चढून काढून दिले. नंतर कपाटाखाली नातीचा बॉल गेला म्हणून जमिनीवर झोपून झाडूने कोपऱ्यात गेलेला तो बॉल काढून दिलेला पाहून तर मी तोंडात बोटे घालून शिट्ट्या मारणं तेवढे शिल्लक होतं. नातीच्या फक्त उपस्थितीने तिचा थकवा, मरगळ कुठच्याकुठे पळून गेली होती. हे सर्व करूनही दमलेला दिसण्याऐवजी तिचा चेहरा उल्हसित दिसत होता. नातवंडं ही आनंदाचे स्रोत असतात, याची जाणीव मला पुनश्च एकदा झाली.आयुष्यातील हवेहवेसे, पुन्हा अनुभवावेसे वाटणारे प्रसंग आपल्याला फक्त नातवंडांच्या सान्निध्यातच येतात. कधी ती आपली आई होऊन आपल्याला प्रेमानं घास भरवतात; तर कधी आपली शिक्षिका होऊन आपली शाळा घेतात. कधी आपली मैत्रीण होऊन भातुकलीच्या खेळात आपल्याला गुंतवून टाकतात. कधी लुटुपुटूची लढाई खेळतात. खोटंनाटं का असेना; पण हे असे आयुष्यातले पुनःप्रक्षेपण आपलं मन प्रफुल्लित करून जातं.

# झुंजारे मल्टीस्पेशालिटी डेंटल हॉस्पिटल मध्ये मोफत दंतरोग तपासणी शिबिर संपन्न


**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नायगाव बा.सामाजिक समतेचे प्रणेते स्वर्गीय मा.आ. बळवंतरावजी चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळा अनावरण आणि स्वर्गीय खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळा व स्मारक अनावरण प्रसंगाच्याच्या निमित्ताने त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ नायगाव येथील झुंजारे मल्टी स्पेशालिटी डेंटल हॉस्पिटलच्या वतीने मोफत दंतरोग तपासणी शिबीर २१ ऑगस्ट २०२५ रोज गुरुवारी सकाळी ११ ते ४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत कॉम्रेड देवरावजी आईलवार यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. या शिबिरा दरम्यान रुग्णासाठी एक्स-रे आणि तपासणी मोफत ठेवण्यात आलेली होती तर दाताला पिन लावण्याच्या उपचारांमध्ये ५०% सूट देण्यात आली होती.त्यामुळे या शिबिरामध्ये अनेक रुग्णांनी लाभ घेतलेला आहे. दवाखान्याचे प्रमुख डॉ.भीष्म झुंजारे आणि डॉ.प्रतिमा झुंजारे यांनी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. शिबिराची सुरुवात कै. मा आ. बळवंतरावजी चव्हाण आणि कै. खा. वसंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.दत्तराव शिंपाळे, डॉ.विश्वास चव्हाण यांच्यासह डॉ. असोसिएशनचे अनेक डॉ.उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये रवींद्र भालेराव, माजी नगराध्यक्ष शरद भालेराव, नगरसेवक दयानंद भालेराव, प्रा. डॉ. शंकर गड्डमवार, शंकरराव गायकवाड, पत्रकार माधव बैलकवाड, पत्रकार पंडित वाघमारे, पत्रकार तानाजी शेळगावकर, ॲड. बापूराव वाघमारे, इंजि. शंकर माळगे,बापूराव गायकवाड, किरणकुमार बायकेवार ई सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव बैलके यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार डॉ. भीष्म झुंजारे यांनी मानले.



# जेवणानंतर पाणी पिण्याची योग्य पद्धत कोणती ?

आजच्या वेगवान युगात अनेकदा लोक निरोगी आहाराकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे पचनाच्या समस्या निर्माण होतात. यानंतर कालांतराने गंभीर आजार उद्भवू शकतात. धावपळीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी लोकांकडे वेळ नसतो. भूक लागल्यावर काहीतरी खाणे, आपण काय खात आहोत आणि त्याचे फायदे काय आहेत, याकडे अनेक जण फारसे लक्ष देत नाही. काहीही खाल्ल्यानंतर आपण लगेचच पाणी पितो. पण जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्यास काय होते आणि पाणी पिण्याची योग्य वेळ कोणती, याबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत. आयुर्वेद आणि इतर नैसर्गिक उपचार पद्धतींमध्ये जेवणानंतर लगेच पाणी पिणे टाळण्याचा सल्ला दिला जातो. जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्यास पचनक्रिया मंदावते. जेवण पचवण्यासाठी शरीरातील पाचक रस आणि अग्नी सक्रिय होतात. लगेच पाणी प्यायल्यास हे पाचक रस पातळ होतात. ज्यामुळे अन्न नीट पचत नाही. यामुळे गॅस, पोट फुगणे आणि अपचन यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. जेवणानंतर लगेच पाणी पिण्याऐवजी ४० ते ४५ मिनिटांनी पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. या वेळेत पचनक्रिया सुरळीत होते. तसेच शरीराला आवश्यक पोषणतत्त्वे शोषून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. तुम्हाला तहान लागली असल्यास जेवणाच्या दरम्यान एक-दोन घोट पाणी पिऊ शकता. परंतु, जास्त प्रमाणात पाणी पिणे टाळा. जेवताना शांत आणि आनंदी वातावरण ठेवा. राग, भीती किंवा ताण यांसारख्या नकारात्मक भावना पचनक्रियेवर वाईट परिणाम करतात. अन्न हळूहळू आणि चावून खाल्ल्याने पचन चांगले होते. यामुळे पाचक एन्झाइम्स सक्रिय होतात. तसेच पोटाच्या समस्या टाळता येतात. आयुर्वेदानुसार, ताजे आणि हंगामात उपलब्ध असणारे पदार्थ खाण्यावर भर द्या. रात्री हलके जेवा आणि लवकर जेवा, जेणेकरून झोपण्यापूर्वी पचनासाठी पुरेसा वेळ मिळेल. जास्त तेलकट किंवा जड पदार्थ खाऊ नका. यामुळे पचनसंस्थेवर ताण येतो, ज्यामुळे गॅस आणि ॲसिडिटी होऊ शकते. दुपारी भरपेट जेवा आणि रात्री हलके जेवा.



# तुम्ही स्वयंपाकघरातील 'या' मसाल्यांकडे दुर्लक्ष करत आहात का ?

भारतीय स्वयंपाकघर हे केवळ चवीचाच नाही तर आरोग्याचाही खजिना मानला जातो. स्वयंपाक करताना आपण अनेकदा चव वाढवण्यासाठी मसाल्यांचा वापर करतो. तर हे मसाले आपल्या आरोग्यासाठी इतके फायदेशीर आहे की त्यांचे औषधी गुणधर्मही काही कमी नाहीत. विशेषतः जिरे, हळद, धणे, हिंग, ओवा, आले, दालचिनी, लवंग आणि काळी मिरी हे मसाले आपल्या आरोग्यासाठी अमूल्य ठरतात. चला तर मग आजच्या लेखात आपण जाणून घेऊयात की कोणते मसाले आपल्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

**हळद आरोग्यासाठी उत्तम आहे.**

हळद ही भारतीय घरांमध्ये जवळजवळ प्रत्येक पदार्थ बनवताना वापरली जाते. केवळ त्याचा रंगच नाही तर त्यात असलेले करक्यूमिन जळजळ कमी करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. हिवाळ्यात हळदीचे दूध आपल्यासाठी अधिक फायदेशीर ठरते, परंतु लक्षात ठेवा की ते जास्त प्रमाणात सेवन केल्याने कधीकधी किडनीच्या समस्या उद्भवू शकतात.

**पचनक्रियेचा साथीदार जिरे**

जिरे हे केवळ चवीसाठीच चांगले नाही तर पचन सुधारण्यास आणि गॅस आणि अपचन कमी करण्यास देखील मदत करते. जिरे तव्यावर भाजून त्याचे सेवन करणे किंवा जेवणात वापरून देखील सेवन करावे. रिकाम्या पोटी जिरे पाणी प्यायल्याने पचन सुधारते.

**धणे पावडर ताजेपणा आणि संतुलन यांचे मिश्रण**

धणे केवळ अन्न हलके आणि सुगंधित करत नाही तर त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. ते रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास मदत करते. पोळ्या, भाज्या आणि ग्रेव्हीमध्ये धणे पावडर वापरल्याने चव आणि आरोग्य दोन्ही वाढते.

**हिंग आणि ओवा पोटाचे रक्षण करते**

गॅस, ॲसिडिटी, अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांसाठी हिंग आणि ओव्याचा वापर फार पूर्वीपासून केला जात आहे. हिंगमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात आणि ओव्यामधील थायमॉल तेल पोटातील अतिरिक्त गॅस काढून टाकण्यास मदत करते.

**आले आणि दालचिनी रोगांचे प्रतिबंधक**

आले पचनसंस्था मजबूत करते आणि पोटफुगीपासून आराम देते. पचन सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी दालचिनी प्रभावी मानली जाते.

**लवंग आणि काळी मिरी चव आणि आरोग्यासाठी उत्तम**

लवंग आणि काळी मिरी हे केवळ अन्नाची चव वाढवण्यासाठीच नाही तर रक्ताभिसरण सुधारण्यासाठी देखील वापरले जातात. थोड्या प्रमाणात लवंग आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तर काळी मिरीमध्ये पचन सुधारण्याची शक्ती असते. भारतीय स्वयंपाकघरातील हे मसाले केवळ चव वाढवतातच असे नाही तर आपले आरोग्य, पचन, रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करतात.दररोज हळदीचे दूध, स्वयंपाकात जिरे किंवा धणे वापरणे, हिंग आणि ओव्याचे सेवन करणे यासारखे छोटे बदल तुमचे आरोग्य अनेक पट्टीने सुधारू शकतात.



# गोड खाण्याची इच्छा झाली? तर बनवा मिनी चोको लावा आप्पे

गोड खाण्याची इच्छा झाली की आपण नेहमी गुलाबजाम, रसगुल्ला किंवा केक बनवतो. पण, आता नेहमीचे पदार्थ खाऊन कंटाळा आला असेल, तर काहीतरी नवीन आणि झटपट होणारी रेसिपी ट्राय करूया. मिनी चोको लावा आप्पे ही अशीच एक हटके रेसिपी आहे, जी दिसायला खूप आकर्षक आणि खायला अप्रतिम लागते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, यासाठी ओव्हनची गरज नाही, फक्त आप्पे पॅनमध्ये तुम्ही हे घरच्या घरी सहज बनवू शकता. बाहेरून कुरकुरीत आणि आतून चॉकलेटचा लावा असणारे हे आप्पे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडतील.

**चोको लावा आप्पे बनवण्यासाठी लागणारे साहित्य**

मैदा : १ कप
चोको पावडर : २ चमचे
साखर पावडर : अर्धा कप
दूध : १ कप
बेकिंग सोडा : अर्धा चमचा
व्हॅनिला इसेन्स : अर्धा चमचा
चॉकलेट क्यूब्स : १०
तूप किंवा बटर : अर्धा कप
चॉकलेट चिप्स : अर्धा कप

**मिनी चोको लावा आप्पे बनवण्याची सोपी पद्धत**

**स्टेप १ :** सर्वप्रथम, एका मोठ्या भांड्यात मैदा, चोको पावडर, साखर पावडर आणि बेकिंग सोडा घेऊन चांगले मिसळा.

**स्टेप २ :** आता त्यात हळूहळू दूध घाला आणि गुठळ्या होणार नाहीत अशा पद्धतीने एक स्मूथ बॅटर तयार करा. बॅटर जास्त घट्ट किंवा पातळ नसावे. शेवटी व्हॅनिला इसेन्स घालून पुन्हा एकदा व्यवस्थित मिसळा.

**स्टेप ३ :** आप्पे पॅन थोडा गरम करून घ्या आणि त्याला तूप किंवा बटर लावून ग्रीस करा. यामुळे आप्पे पॅनला चिकटणार नाहीत.



**स्टेप ४ :** प्रत्येक आप्पेच्या साच्यात थोडं बॅटर घाला, त्यानंतर मध्यभागी एक चॉकलेट क्यूब किंवा काही चॉकलेट चिप्स ठेवा. चॉकलेट पूर्णपणे झाकले जाईल अशा पद्धतीने त्याच्यावर पुन्हा थोडं बॅटर घाला.

**स्टेप ५ :** आता आप्पे पॅनवर झाकण ठेवा आणि मंद आचेवर ५-६ मिनिटे शिजू द्या. खालची बाजू सोनेरी झाल्यावर आप्पे पलटा आणि दुसऱ्या बाजूने २-३ मिनिटे शिजवा.

**स्टेप ६ :** गरमागरम आप्पे एका प्लेटमध्ये काढा. वरून चॉकलेट सिरप किंवा पिठीसाखर घालून सजवा. तुमचा गरमागरम आणि लावासारखा चॉकलेटी पदार्थ तयार आहे!

**काही महत्त्वाच्या टिप्स**

बॅटरमध्ये कोणत्याही गुठळ्या राहू नयेत याची काळजी घ्या.

लहान मुलांसाठी बनवत असाल तर डार्क चॉकलेटऐवजी मिल्क चॉकलेटचा (चळश्रज्ञ उहेलेश्रींश) वापर करा.

लावा इफेक्टसाठी आप्पे गरमागरम असतानाच खावेत.

हे मिनी चोको लावा आप्पे तुम्ही मुलांच्या टिफिनमध्ये देऊ शकता, किंवा अचानक घरी आलेल्या पाहुण्यांसाठीही गोड पदार्थ म्हणून बनवू शकता

## महाराष्ट्रातील किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश व ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वीतेसाठी

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शिवसेनेच्या खासदारांनी केला मराठमोळा सन्मान

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या सुरक्षेसाठी ऑपरेशन सिंदूर राबवले तसेच महाराष्ट्रातील किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल शिवसेना गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत त्यांचे कौतुक करत अभिनंदन केले. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठीही यावेळी शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवसेनेच्या सर्व खासदारांच्या कामाचे कौतुक केले. शिवसेनेच्या शिष्टमंडळात गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे, प्रवक्ते, खासदार नरेश म्हस्के यांच्यासह खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील माने, रविंद्र वायकर, मिलिंद देवरा, प्रतापराव जाधव आदी उपस्थित होते. यावेळी मराठमोळ्या पद्धतीने नरेंद्र मोदी यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन आणि मराठा पगडी घालून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोदींनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराज हे माझे आदर्श आहेत. मी ज्यावेळी लोकसभेची निवडणूक लढतो आणि पंतप्रधान पदाच्या शर्यतीत आलो, त्यावेळी रायगडावर जाऊन प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले, त्यांची आराधना केली आणि त्यानंतरच पंतप्रधान झालो, अशा आठवणी यावेळी जागवल्या. आज प्रत्येक भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक नागरिक अभिमान आणि भावनांनी भारलेला आहे. तुमच्या अथक प्रयत्नांमुळे आणि दूरदर्शी नेतृत्वामुळे पॅरिस येथे झालेल्या जागतिक वारसा समितीच्या ४७ व्या अधिवेशनात एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. जिथे २० पैकी १८ देशांनी भारताच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले १२ किल्ले युनेस्को (भारत) जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. हे भारताचे ४४ वे जागतिक वारसा स्थळ आहे, ज्यामुळे आपण जगात सहाव्या



आणि आशिया पॅसिफिक प्रदेशात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. शिवसेना संसदीय पक्षाच्या वतीने, आम्ही या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मनापासून कृतज्ञता आणि मनापासून आभार व्यक्त करत असल्याची भावना शिवसेना खासदारांनी व्यक्त केली. या यादीत महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग तसेच तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा समावेश मराठा वारशाची व्याप्ती दर्शवितो. हे किल्ले डोंगरमाथ्यापासून किनारी चौक्यांपर्यंत पसरलेले आहेत आणि मराठ्यांच्या भौगोलिक विभाग आणि संरक्षण नियोजनाचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्राचा समृद्ध वारसा अधोरेखित होईल आणि आपल्या तरुणांमध्ये त्याच्या इतिहासाबद्दल एक नवीन चेतना आणि अभिमान निर्माण होईल. या किल्ल्यांचे संरक्षण होईल, पर्यटनाला चालना मिळेल, ते संशोधकांसाठी महत्त्वाचे अभ्यासस्थळ बनतील. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला एक नवीन चालना मिळेल. तुम्ही सर्व देशवासीयांना या किल्ल्यांना भेट देऊन मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास जाणून घेण्याचे आवाहन केले आहे. तुमची हाक प्रत्येक भारतीयाला त्यांच्या मुळांशी जोडण्यासाठी प्रेरणा देईल, असा आम्हाला विश्वास आहे. या ऐतिहासिक वारशांचे जतन करण्यासाठी आणि त्यांचे वैभव वाढवण्यासाठी तुमच्या प्रत्येक प्रयत्नात शिवसेना पक्ष पूर्णपणे तुमच्यासोबत आहे असे यावेळी शिवसेना खासदारांनी सांगितले.

# पंधराव्या वित्त आयोग निधीला ग्राम सभेची मंजुरी;उपसरपंचांचा बहिष्कार

**पाली । प्रतिनिधी**

पाली ग्रामपंचायतीअंतर्गत पंधराव्या वित्त आयोगाचा २०२१-२२ पासून अखर्च असलेला निधी अखेर आज (२२ ऑगस्ट) झालेल्या ग्रामसभेत खर्चासाठी मंजूर करण्यात आला. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने हजर राहून आराखड्यानुसार कामांना मंजुरी दिली. मंजूर निधीच्या कामांना तात्काळ गती देण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला.



ग्रामसभा ऐतिहासिक ठरावी इतक्या मोठ्या प्रमाणावर गाव एकवटले होते. मात्र, गावाचे उपसरपंच महेंद्र वीर आणि सदस्य साळुंके अनिल यांनी ग्रामसभेला बहिष्कार टाकत विरोधाचा सूर लावला. त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीची भावना व्यक्त होताना दिसली. ग्रामविकास अधिकारी शंकर वाघमारे यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत महिला सरपंच मंजुषा नवले यांनी विकासकामे तात्काळ पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी देखील विकासकामांना एकमुखी पाठिंबा दर्शवत अखर्च निधी रोखून धरल्याबद्दल अप्रत्यक्ष संतापही व्यक्त केला.ग्रामसभेतील एकमुखी निर्णयानुसार, निधीतील कामे ठरलेल्या आराखड्याप्रमाणे पूर्ण होणार असून गावाच्या विकासात अडथळा आणणाऱ्यांना ग्रामस्थांनी धडा शिकवावा, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

# प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा संघर्ष; अकरावी प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविण्याची मागणी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार येथील जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी (दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी पालकांनी अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढवण्याची मागणी केली. अनेक विद्यार्थी इंटरनेटच्या सुविधेअभावी, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, तसेच तांत्रिक ज्ञानाची कमतरता आणि आर्थिक परिस्थितीमुळे अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रवेश प्रक्रियेसाठी पुन्हा संधी मिळावी, अशी विनंती पालकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



या वर्षी अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जात आहे. आतापर्यंत या प्रक्रियेच्या चार ते पाच फेऱ्या पूर्ण झाल्या असून, ऑनलाइन पोर्टल बंद करण्यात आले आहे. मात्र, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक आदिवासी आणि ग्रामीण भागांतील विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित आहेत. दुर्गम भागांत इंटरनेट आणि वीजपुरवठा ही मोठी समस्या आहे, ज्यामुळे अनेक गरजू विद्यार्थी वेळेत अर्ज भरू शकले नाहीत.या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वंचित विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा अर्ज भरण्याची संधी मिळावी, अशी विनंती पालकांनी केली आहे. या मागणीमुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित राहील. पालकांच्या या विनंतीवर जिल्हाधिकारी सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घेतील, अशी अपेक्षा आहे.

# गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करा-जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया





**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा देशभरात जल्लोषात साजरा होणारा सण आहे. महाराष्ट्राला या उत्सवाची मोठी परंपरा लाभली आहे. यंदाच्या वर्षी राज्य शासनाने गणेशोत्सव 'राज्योत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्व गणेश मंडळांनी हा गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.श्री गणेशोत्सव २०२५ च्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे आणि पोलीस उपअधीक्षक वैभव कलबुर्गी यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. आशिया म्हणाले, गणेशोत्सव साजरा करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची सर्वांनी दक्षता घ्यावी. गणेश मंडळांनी देखावे व सजावट करताना शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित देखावे तयार करावेत. याबाबत शासनामार्फत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, सर्व मंडळांनी त्यात सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.मिरवणुकीच्या मार्गावरील खड्डे तातडीने दुरुस्त करावेत. महानगरपालिका क्षेत्रातील कचरा प्रश्न सोडवण्यासाठी अधिक मनुष्यबळ आणि वाहने उपलब्ध करून द्यावीत. शहरातील रस्त्यांवरून मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. विसर्जनस्थळी प्रकाश व्यवस्था, लाईफगार्ड्स आणि पार्किंगची सोय करावी. शहरातील पथदिवे नियमित सुरू राहतील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना ध्वनीप्रदूषणाचा त्रास होऊ नये म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठरवून दिलेल्या वेळेत आणि डेसिबल मर्यादेतच आवाज ठेवावा. उत्सवादरम्यान वाहतुकीची कोंडी होणार नाही याची काळजी घेऊन वाहतूक सुरळीत राहील यासाठी कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.डॉ. आशिया यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेची माहिती दिली. ते म्हणाले, अपघात, कॅन्सर, गुडघा आणि मणक्यांची शस्त्रक्रिया, हृदयरोग अशा गंभीर आजारांवर उपचार घेणाऱ्या आर्थिक दुर्बल व गरजू रुग्णांसाठी ही योजना आशेचा किरण ठरली आहे. या योजनेसह 'ऑपरेशन सिंदूर' आणि 'आत्मनिर्भर भारत' याबाबतही सर्व गणेशमंडळांनी जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी केले.

गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी आणि सूचनांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश देत जिल्हा प्रशासनाकडून गणेश मंडळांना कोणतीही अडचण येणार नाही याची काळजी घेतली जाईल, तसेच मंडळांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.पोलीस अधीक्षक श्री.घार्गे म्हणाले, गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करताना कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची सर्वांनी काळजी घ्यावी. ४०० समाजकंटकांची यादी तयार करण्यात आली असून त्यांना उत्सवादरम्यान हद्दपार करण्याची कार्यवाही केली जाईल. चोऱ्या रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस तैनात करण्यात येतील. सर्व गणेश मंडळांनी सुरक्षिततेसाठी आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. गणेश विसर्जनाच्या मिरवणुका वेळेत सुरू व्हाव्यात. गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण शांततेत साजरे व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.मुंडे म्हणाले, शहरातील रस्त्यांची कामे सुरू आहेत. ज्या ठिकाणी कामे तातडीने होऊ शकत नाहीत तिथे दुरुस्ती केली जात आहे. रस्त्यावरील मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल. शहराच्या स्वच्छतेवर भर दिला जात असून ३० घंटागाड्या आणि १० ट्रॅक्टरच्या माध्यमातून कचरा गोळा केला जात आहे. उत्सवकाळात अधिक मनुष्यबळ व वाहने उपलब्ध करून स्वच्छता केली जाईल. शहरातील पथदिवे सुरू राहतील याची दक्षता घेतली जात आहे. मंडळांना परवानगीसाठी 'एक खिडकी योजना' सुरू करण्यात आली आहे. विसर्जनासाठी पारंपरिक ठिकाणांव्यतिरिक्त १७ ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंडे तयार करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.या बैठकीला विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या अडचणी व काही महत्त्वाच्या सूचना मांडल्या.

# गणेशोत्सवात कोकण प्रवास सोपा

## राज्य सरकारकडून टोलमाफीचा मोठा दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

यंदा गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी प्रवास अधिक सोपा आणि आर्थिकदृष्ट्या सुलभ होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले आहे की, २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील टोल नाक्यांवर टोल माफ केले जाईल.शासनाने या टोलमाफीसाठी गणेशोत्सव २०२५ - कोकण दर्शन नावाचे विशेष पास प्रणाली सुरू केली आहे. या पासवर वाहन क्रमांक आणि मालकाची माहिती नोंदवली जाईल. पास प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस विभाग आणि वाहतूक खात्याकडून उपलब्ध करून दिला जाईल आणि तो परतीच्या प्रवासातही वैध राहणार आहे.



कोकणवासीयांसाठी गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही तर आपल्या मातीशी, घराशी आणि कुटुंबाशी पुन्हा जोडणारा सोहळा आहे. हजारो लोक या काळात गावी जातात. त्यामुळे शासनाने घेतलेले टोलमाफीसारखे निर्णय प्रवासाला गती देणारे आणि आर्थिकदृष्ट्या सोयीचे ठरतात. यंदाचा गणेशोत्सव टोलमाफी व विशेष रेल्वेसेवेमुळे अधिक खास होणार आहे.शासनाने ग्रामीण व शहरी पोलीस तसेच परिवहन विभागाला समन्वय साधून वेळेत पास वाटप करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून भाविकांना कोणताही अडथळा येऊ नये. तसेच, विशेष रेल्वेसेवा मोफत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था मंत्री नितेश राणे यांनी जाहीर केली आहे.गणपती बाप्पा मोरया च्या गजरात हजारो गाड्या आणि एसटी बसेस कोकणाच्या मार्गावर धावणार आहेत. टोलमाफी व विशेष रेल्वेसेवेमुळे चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि आनंददायी होईल.

# मुंबईतील पुनर्विकासामुळे वाढती वाहनसंख्या आणि वाहतूक कोंडी ;राज ठाकरे यांचा मुख्यमंत्र्यांकडे आराखडा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी भेट घेऊन शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि पुनर्विकासामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा केली. यावेळी राज ठाकरे यांनी वाहतूक व्यवस्थेबाबतचा आराखडा सादर केला.

यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना राज ठाकरे म्हणाले, शहर नियोजन हा माझा आवडीचा विषय आहे. मुंबईत तसेच उपनगरात मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास सुरू आहे. जिथे पूर्वी ५० माणसे राहत होती, तिथे आता ५०० माणसे राहतात. त्यामुळे गाड्या वाढल्या, कचरा वाढला आणि रस्त्यांवर प्रचंड ताण आला. परिणामी शहराचा बट्ट्याबोळ होत आहे. मुंबईतील अलीकडील पावसामुळे



झालेल्या पाणी साचणे, खड्डे अशा समस्यांवरही त्यांनी भाष्य केले. मात्र आजची बैठक प्रामुख्याने वाहतुकीच्या प्रश्नावर केंद्रित असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या गंभीर प्रश्नावर सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले, असे ठाकरे यांनी सांगितले. पार्किंगसंदर्भात राज ठाकरे यांनी महत्त्वाचे प्रस्ताव मांडले. खेळाच्या मैदानाखाली पार्किंग तयार करता येईल, ज्यामुळे मैदानांचे मूळ स्वरूप अबाधित राहील. तसेच रस्ते आणि पदपथावर रंग लावून पार्किंग व नो-पार्किंग क्षेत्र स्पष्ट करावे, दंडाची रक्कम वाढवावी, अशी मागणी त्यांनी केली. मद्यपान करून वाहन चालवल्यास दंडवाढ केल्याने जनजागृती झाली. तसाच परिणाम पार्किंग नियमांसाठीही होईल,असे ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले,आपण कबूतर, हत्ती अशा गौण विषयांत अडकतो; पण वाहतूक कोंडीसारख्या गंभीर प्रश्नाकडे पुरेसे लक्ष जात नाही. रस्त्यावर बेदरकारपणे गाड्या उभ्या राहतात. या समस्येकडे आता गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. यासाठीच मी मुख्यमंत्री फडणवीस यांना सविस्तर आराखडा दिला आहे.

# रिपाइंच्या संकल्प मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा-तालुकाध्यक्ष दिपक कांबळे

**केज । प्रतिनिधी**

बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना सामाजिक शैक्षणिक व सामाजिक स्तरावर खऱ्या अर्थाने हक्क मिळवून देण्यासाठी गायरान धारकांचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी व विविध प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना. रामदास आठवले यांच्या आदेशा वरून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज तालुका रिपाइंच्या वतीने दि. २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी दुपारी ठीक १२:३० वाजता मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे संकल्प मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास राजू जोगदंड, मझरखान प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याच मेळाव्याच्या माध्यमातून येऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काय संदेश देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण झाले असताना सुद्धा उपेक्षित घटकातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी संघर्ष करावा लागत आहे. उपेक्षित घटकातील समाज बांधवांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी केज तालुका रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज शहरातील मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे रिपाइंचा भव्य संकल्प मेळावा २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. तरी या मेळाव्यास रिपाइं पदाधिकारी, युवा आघाडी पदाधिकारी, गायरानधारक, घरकुलधारक, कार्यकर्ते यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन संकल्प मेळाव्याचे आयोजक तथा केज रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, राहुल सरवदे, रवींद्र जोगदंड ,दिलीप बनसोडे, ईश्वर सोनवणे, विकास मस्के, कपिल कागदे, रमेश निशिगंध, गौतम बचुटे, निलेश ढोबळे, राजेश सोनवणे, सुरज काळे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रशांत हजारे, अनिता वाघमारे, सुरेखा गायकवाड, सरस्वती शिनगारे, विकास आरकडे, भारत गायकवाड, मिलिंद भालेराव, कैलास जावळे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला, जयपाल रोकडे, प्रदिप शिनगारे, नितीन घोडके, हरेंद्र धीरे, डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे, विनोद गायकवाड, रवींद्र तुपारे, संभाजी हजारे, विनोद शिंदे, रोहित बचुटे, राहुल बचुटे, आदींनी केले आहे. या संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून काही दिवसात येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पप्पू कागदे हे कार्यकर्त्यांना काय संदेश देणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बॅनर्स, झेंडे आणि पताका लागल्याने मेळाव्याची चर्चा :- केज शहरात आणि शहरात येणाऱ्या रस्त्यांवर शहराच्या बाहेर देखील दीड ते दोन किमी अंतरावर मेळाव्याचे बॅनर्स, झेंडे आणि पताका लावल्याने सर्वत्र मेळाव्याची चर्चा आहे. तर दीपक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावागावात बैठका सुरू आहेत.



## अंबाजोगाई येथील कपील गणेश मंदिर येथे रविवारी गाजरे यांचे तबला वादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील कपील गणेश मंदिर येथे संगीत साधना मंच,आदर्श गणेश प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी सकाळी साडे दहा वाजता आदर्श वसाहती मधील कपिल गणेश मंदीर येथे शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी नांदेड येथील प्रख्यात तबला वादक प्रशांत गाजरे यांचे स्वतंत्र तबला वादन होणार आहे. संवादिनीवर परभणी येथील मंगेश जवळेकर हे साथ संगत करतील या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



### जनजाती गौरव’ विशेष कार्यक्रमांतर्गत

## बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन-डॉ.क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त ‘जनजाती गौरव’ विशेष कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ‘भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका’ या विषयावर आधारित हे चर्चासत्र २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याची माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.



बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बुधवारी (दि.२०) ते बोलत होते. यावेळी संयोजन समितीचे सल्लागार डॉ.सुधाकर गुट्टे, परिषद संयोजक प्रा.हमराज उईके यांची उपस्थिती होती.या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने केले असून भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थांचे सहकार्य लाभले आहे. जगभरात ३७ चर्चासत्र होत आहेत. त्यापैकी ५ आंतरराष्ट्रीय तर उर्वरित राष्ट्रीय पातळीवरील असतील. ५ आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांपैकी बीडमध्ये १ होत आहे. यानिमित्ताने बीडचे नाव जगभरातील शैक्षणिक, सामाजिक वर्तुळात जाणार आहे.

## एन्व्हॉयर्मेंटल फोरमच्या मृदगंध स्पर्धेत गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलला विजेतेपद

**बारामती । प्रतिनिधी**

येथील एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित मृदगंध २०२५ सांस्कृतिक स्पर्धेत कृषी उदयोग मूल शिक्षण संस्थेचे गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलने सादर केलेल्या स्वप्न एक शांततेचे या नाटिकेस प्रथम क्रमांकाचा मृदगंध करंडक प्रदान करण्यात आला.बुधवारी (ता. २०) गदिमा सभागृहात झालेल्या स्पर्धेत यंदा २४ शाळांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव देण्यासाठी फोरमच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या संकल्पनेतून मृदगंध विविध गुणदर्शन स्पर्धा दरवर्षी घेतली जाते.या स्पर्धेत विदया प्रतिष्ठान विनोदकुमार गुजर बाल विकास मंदीर शाळेच्या पालक व परिक्षा या लघुनाटिकेस द्वितीय तर विद्या प्रतिष्ठान मराठी माध्यमिक शाळेच्या पथनाट्याच्या सादरीकरणास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान केले गेले.झैनुबिया इंग्लिश मिडीयम स्कूलला उत्तेजनार्थ प्रथम तर विद्या प्रतिष्ठान न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल एस.एस.सी. बोर्ड शाळेस उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.या स्पर्धेतील उत्कृष्ट अभिनय स्त्री पारितोषिक-अनन्या प्रमोद धायगुडे (वि.प्र. मराठी माध्य. शाळा) व यशोधरा ज्योतीपाल खरात (आर.एन. आगरवाल टेक्निकल हायस्कूल) यांना तर स्त्री अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक ईश्वरी परशुराम दिवटे (बा.न.प.शाळा क्रं. पाच), श्रेया दत्तात्रय कळसाईत (आर.एन. आगरवाल टेक्निकल हायस्कूल) व श्रावणी मोहन कदम (वि.प्र. मराठी माध्यमिक शाळा) यांना मिळाले.

## बीडचे भूमिपुत्र तथा सुप्रसिद्ध अभिनेते मिलिंद शिंदे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पीएचडी प्रदान

### सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव!

**बीड । प्रतिनिधी**

मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र मिलिंद रामदास शिंदे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठातून पीएच डी ही पदवी प्रदान करण्यात आली. पीएचडी मिळाल्या बद्दल अभिनेते मिलिंद शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र श्री मिलिंद रामदास शिंदे यांचे पाटोदा तालुक्यातील निरगुडी हे मूळ गाव आहे. त्यांचे वडील रा.जा. शिंदे हे बीड जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पबचत अधिकारी पदावर कार्यरत होते. पुढे त्यांनी कायद्याची पदवी घेऊन अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय सुरू केला होता. दरम्यान अभिनेता मिलिंद शिंदे हे अनेक वर्ष बीडच्या बीअँड सी क्वार्टर मध्ये वास्तव्य करत होते. त्यामुळे त्यांना बीड जिल्ह्यासह बीड शहराची




खडा ना खडा माहिती आहे. अभिनयाची आवड असल्याने मिलिंद शिंदे यांनी नाटकाच्या माध्यमातून चित्रपट दुनियामध्ये पदार्पण केले. कसदार अभिनयातून त्यांनी मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीला. 'झुलवा' ती फुलराणी, कथा अरुणांची, यासारख्या अनेक गाजलेल्या नाटकापासून ते नटरंग, पारध, नॉट ओन्ली मिसेस राऊत, या चित्रपटात त्यांची व्यक्तिरेखा प्रेक्षकांना खूप भावली. त्यांच्या अभिनयाला प्रेक्षक मायबापांनी नेहमीच दाद दिली आहे. छोट्या पडद्यावरही 'तू तिथे मी' आणि 'देव माणूस' आदी मालिका मधील त्यांच्या भूमिका संस्मरणीय आहेत. अभिनेते विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील 'स्त्री भूमिका' या विषयावर अभिनेता मिलिंद शिंदे यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठात पीएचडीसाठी प्रबंध सादर केला. त्या बद्दल त्यांना नुकतीच मान्यवरांच्या हस्ते पीएचडी पदवी मोठ्या शानदार सोहळ्यामध्ये प्रदान करण्यात आली. अभिनेते मिलिंद शिंदे यांना पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल बीड जिल्ह्यात सह राज्यभरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामकाज-विकास आणि तत्परता यांचा समन्वय

### अंकुश पालवे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याच्या विकासाला गती

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या विकासाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रभावी कामकाजामुळे नवी दिशा मिळाली आहे. कार्यकारी अभियंता अंकुश पालवे यांच्या नेतृत्वाखाली विभागाने विकासकामे आणि आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी समन्वय साधत जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीला गती दिली आहे.



विभागाच्या तत्परतेचे उदाहरण नुकतेच तळोदा तालुक्यातील चांदसैली घाटात पाहायला मिळाले. संभाव्य दरड कोसळण्याची शक्यता लक्षात घेता, उपविभागीय अधिकारी व शाखा अभियंत्यांना तातडीने कारवाईचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार, उपअभियंता नितीन वसावे आणि शाखा अभियंता सुधाकर चौरे यांनी केवळ दोन तासांत दरड आणि मलबा हटवून रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित केला. विभागाने अशा आपत्कालीन परिस्थितीसाठी २४७ सज्ज यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

यासोबतच, नंदुरबार सा.बां. विभाग विविध विकास प्रकल्पांवर लक्ष ठेवून आहे. एडीबी-इपीसी-३९ अंतर्गत येणाऱ्या सावळदे-रनाळा-शनिमांडळ-छडवेल रस्त्याच्या कामाची पाहणी करून गुणवत्ता आणि सुरक्षा मानकांचे पालन करण्याचे निर्देश ठेकेदाराला देण्यात आले आहेत. जिल्हा रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वॉटरप्रूफिंग कामाची पाहणी करून ती वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, नटावद ग्रामीण रुग्णालयीन इमारत आणि मॉडेल डिग्री कॉलेज व वसतीगृह इमारत यांसारखी महत्त्वाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार येथे आयोजित सर्व उपविभागांच्या आढावा बैठकीत कामांची प्रगती तपासण्यात आली. याशिवाय, नाशिक प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांच्या आढाव्यात नंदुरबार विभागाने आपले उत्कृष्ट काम सिद्ध करून अग्रसेर स्थान मिळवले आहे. एकंदरीत, नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि इतर पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमध्ये गुणवत्ता, वेग आणि तत्परता यांचा उत्कृष्ट समन्वय साधत जिल्ह्याच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

## डॉ.दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळीत निर्भय बनो मॉर्निंग वॉक संपन्न



**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळी च्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळी शहरातील जिजामाता उद्यान ( गार्डन ) येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी निर्भय बनो मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते. या मॉर्निंग वॉकला परळी येथील जिजामाता उद्यान ( गार्डन ) दिनांक २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी ठीक ७ वाजता सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या सर्व पदाधिकारी व पुरोगामी विचारांच्या नागरिकांनी पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. त्या नंतर निर्भय बनो मॉर्निंग वॉक करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी ही केली. याप्रसंगी जेष्ठ अंनिस सदस्य जी.एस.सौंदळे,प्रा. विलास रोडे,रानबा गायकवाड,अनिलराव मस्के , अशोक मुंडे,विकास वाघमारे,दिपक शिरसाट, नवनाथ दाने, पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार संजीब रॉय, विठ्ठलराव झिलमेवाड,बाळासाहेब किरवले,राहुल सुर्यवंशी,माधव अजले,भगवान राठोड,विनायक काळे,भानुदास उपाडे,आनंद तुपसमुद्रे,सुमित कलशेटे आदी उपस्थित होते.

## युवा कौशल्य संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन महिला होत आहेत स्वावलंबी-श्री.ईश्वर निमसे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर च्या मार्फत निंबळक तालुका नगर जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी महिला सक्षमीकरण चा प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवून आरी वर्क प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी गावातील महिलांनी आरी वर्कचे उत्कृष्ट पद्धतीने पूर्ण केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा सांगता समारंभ संस्थेचे अध्यक्ष श्री. ईश्वर निमसे सर यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्र वितरण करून करण्यात आला. यावेळी महिलांनी स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे व आपले व्यवसाय करावेत आणि सक्षम कुटुंब घडवावे. असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष माननीय ईश्वर निमसे सर



यांनी केले.त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या कामाबद्दल माहिती सांगितली. तसेच महिलांनी या व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपली एक वेगळी ओळख निर्माण करून समाजामध्ये मानाचे स्थान तयार करावे अशाप्रकारे महिलांना आश्वस्थ करून महिलांना पुढील काळामध्ये संस्थेमार्फत जी काही मदत लागेल ती मदत करण्याची ग्वाही दिली. यावेळी या कार्यक्रमास ग्रामपंचायत निंबाळक च्या सरपंच प्रियांकाताई लामखेडे यादेखील उपस्थित होत्या त्यांनी महिलांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाप्रसंगी कृषी आमोद गटाच्या अध्यक्षा सौ. निकीता अमित कोरडे आणि अष्टक गृह उद्योगाच्या अध्यक्ष सौ. सुरेखा दशरथ घोलप आणि सुनंदा बापू साखरे, उमेद अभियानाच्या सी.आर.पी. पगारेताई तसेच प्रशिक्षणाच्या प्रशिक्षिका अक्षदा भोळे मॅडम उपस्थित होत्या. सौ. आशाताई खांडेकर यांनी प्रशिक्षणासाठी जागा उपलब्ध करून देऊन संस्थेस खूप मोलाचे सहकार्य केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077